दुरध्वनी :२२९२४२, २२९२४३ फॅक्स : (०२४६२) २५९४६१

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,

विष्णुपुरी, नांदेड- ४३१ ६०६ महाराष्ट्र (भारत)

---

जा.क्रः विशेषकक्ष/सांख्यिकी/२०११-१२/९९१-९२ दिनांक १९.१२.२०११.

**तात्काळ/कालमर्यादीत**

प्रति,

**मा.प्राचार्य**

सर्व संलग्नित महाविद्यालय,

प्रस्तुत विद्यापीठ.

**विषयः महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाची मॅनेजमेंट इन्फोर्मेशन सिस्टम** M.I.S. **तयार करण्याची कार्यवाही बाबत.**

संदर्भः- मा.शिक्षण संचालक उच्च शिक्षण पुणे यांचे पत्र कं.उशिसं/एम.आय.एस. /४२९८ दि. ०३.१०.२०११

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०११-१२ च्या अनुषंगाने **विवरण पत्र कमांक ०१ ते ४२** बाबतची आपल्या महाविद्यालयाशी संबंधीत असलेली आवश्यक ती माहिती भरुन मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे व शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण नांदेड यांचेकडे त्वरीत पाठविण्याबाबत कळविले आहे.

सदर माहितीचे विवरण पत्र शिक्षण संचालकाच्या संकेत स्थळावर व सहसंचालक कार्यालयात उपलब्ध आहे. त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालयाशी संबंधीत असलेली माहिती विवरण पत्रात भरुन एक प्रिंटसह सिडी मध्ये आठ दिवसाच्या आत मा.शिक्षण सहसंचालक नांदेड व विद्यापीठाकडे न चुकता तात्काळ सादर करण्यात यावी.

आपला विश्वासु,

**संचालक**

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत- मा. सहसंचालक, कार्यालय, विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्चशिक्षण नांदेड विभाग, नांदेड

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : dhepune@yahoo.co.in,director@dhepune.gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११९५३/२६०५१७२९


क्र. उशिसं/सांख्यिकी /एम.आय.एस./ ४२०८ दिनांकः- ०३/१०/२०११

प्रति,

१. सर्व सहसंचालक,उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालय, विभागीय कार्यालय, ..नांदेड

२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापिठे , ------------------------------------------

------------------------------------------

**विषयः-महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाची मॅनेजमेंट इन्फोर्मेशन सिस्टम (M.I.S.) तयार करण्याची कार्यवाही बाबत.**

संदर्भः-मा. सहसचिव, महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांनी दिनांक २९ सप्टें.ते ०१ ऑक्टो.२०११ या कालावधीत सिडनहॅम अर्थशास्त्र व वाणिज्य महाविद्यालय मुंबई येथील बैठकीत दिलेली सुचना.

उपरोक्त विषयी सुचीत करण्यात येते की, केंद्र व राज्य शासनास या संचालनायाकडून उच्च शिक्षणाशी संबंधीत विविध प्रकारची माहिती वेळोवेळी सादर करण्यात येते. मा.सहसचीव यांनी या संदर्भात सन २०११-१२ या वर्षाची सर्वंकष 'एम.आय.एस.' माहिती संकलीत करण्याच्या दृष्टीने तयार केलेली ४२ विवरण पत्र सर्व सहसंचालक यांना पाठवून देऊन या विवरण पत्रामध्ये अचूक माहिती संकलीत करुन घेण्यासाठी आपल्या समक्ष बैठकीमध्ये सुचना दिलेले आहेत. यास्तव आपणास सुचित करण्यात येते की, आपल्या विभागाअंतर्गत असलेल्या सर्व अकृषी विद्यापीठे / महाविद्यालय /शासकीय महाविद्यालय संस्था / वस्तीगृहे यांच्याकडून सोबतच्या ४२ विवरण पत्रा मधून माहिती भरून घेऊन ती अचूक असल्याची खात्री करून या संचालनायास ३१ ऑक्टोबर २०११ या कालमर्यादेपर्यत न चुकता सादर करावे. परिक्षतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची माहिती भरण्यासाठी मागील परिक्षाचा तपशील गृहीत धरावा. त्याचप्रमाणे विद्यार्थी पट संख्या व शिक्षकीय / शिक्षेकेतर पदांची माहिती संकलनासाठी ३० सप्टेंबर २०११ हा संदर्भ दिनांक वापरावा.

सदर माहिती आपल्याकडून संकलीत होऊन प्राप्त झाल्यानंतर राज्याची एकत्रित माहिती केंद्र शासनास व राज्य शासनास सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे कृपया आपण व्यक्तीशः लक्ष देऊन सदर माहिती संचालनायास विहीत वेळेत सादर करण्याची दक्षता घ्यावी.

3/10/2011

(डॉ. प्र. रा. गायकवाड)

संचालक,

उच्च शिक्षण संचालनालय,

मध्यवर्ती इमारत, पुणे

प्रतः :-मा. सहसचिव, महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई

कार्यालय

विभागिय शिक्षण सहसंचालक